# बाजारपेठेसाठी गुणवत्ता

**ग्राहकांकडून मागणी असलेल्या जातींची निवड, गुणवत्ता, चांगला साठवणूक कालावधी, नैसर्गिक सैल घड, मोठे मणी आदी वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.**

■ रोशनी आर.समर्थ
■ डॉ. अनुराधा उपाध्याय

सन २०१८ मध्ये जागतिक द्राक्ष उत्पादनात भारत सातव्या क्रमांकावर होता. भारतातील एकूण द्राक्ष उत्पादनात महाराष्ट्राचा सर्वाधिक वाटा आहे. २०१९-२० मध्ये भारताची निर्यात नेदरलँड (३२ टक्के , बांगला देश (१८ टक्के), रशिया (१३ टक्के) आणि युके (८ टक्के) अशी राहिली. युरोपीय बाजारात भारतीय द्राक्ष निर्यातीचा कालावधी फेब्रुवारी ते एप्रिल दरम्यान जास्त असतो. द्राक्ष व्यापारात जात,मण्याचा आकार, रंग, जाडी, परिपक्वता कालावधी, वाहतूक सहजता आणि काढणी पश्चात कालावधी या बाबींना महत्त्व असते.

### भारताला नवीन द्राक्ष जातींची गरज का?

थॉमसन सीडलेस (पांढरा) आणि शरद सीडलेस (रंगीत) या आपल्याकडील मुख्य जाती आहेत.आपली स्पर्धा चिली, दक्षिण आफ्रिका, पेरू आदी देशांसोबत आहे. युरोपिय बाजारपेठेत ग्राहकांकडून मागणी असलेल्या जातींवर भर देणे गरजेचे आहे.

## निर्यातीच्या अनुषंगाने गुणवत्ता सांगणारे घटक

**नैसर्गिक सैल घड आणि मोठे मणी :**

काही जातीमध्ये नैसर्गिक घड सैल असतात. त्यात संजीवकांचा वापर होत नाही किंवा कमी असतो. मणी विरळणीची आवश्यकता कमी असून मण्याचा विकास एकसारखा होतो. काही बागायतदार मोठ्या व्यासाचे मणी तयार करण्यासाठी शिफारशीपेक्षा अधिक प्रमाणात संजीवकांचा वापर करतात. त्यामुळे मण्याची त्वचा जाड होऊन गुणवत्तेत घट होते.

**रंग आणि चव :**

भारतातील उष्ण हवामानाच्या परिस्थितीत रंगीत द्राक्ष जातींमध्ये एकसमान रंग येण्यासाठी अडचण निर्माण होते. या समस्येवर मात करण्यासाठी काही संजीवकांचा वापर केला जातो.

**भिन्न परिपक्वता कालावधी :**

भारतीय द्राक्ष निर्यातीचे लक्ष्य देशांमध्ये युरोप प्रमुख आहे. द्राक्ष पुरवठा फेब्रुवारी ते एप्रिलच्या कालावधीत होतो.

**काढणीपश्चात गुणवत्ता :**

राष्ट्रीय किंवा परदेशी बाजारपेठेपर्यंत द्राक्ष पोहोचेपर्यंत गुणवत्ता हा महत्त्वाचा घटक आहे.

**उत्पादकता :**

उत्पादकता योग्य प्रकारे राहिल्यास द्राक्षाचे अर्थशास्त्र फायदेशीर राहते.

**किडी-रोग प्रतिकारकता :**

उत्पादन खर्चातील बराचसा खर्च किडी-रोगांच्या नियंत्रणासाठी होतो. द्राक्षाची गुणवत्ता या बाबीवर देखील अवलंबून असते.

### युरोप बाजारपेठेसाठी महत्त्वाच्या जाती :

**व्हाइट जाती :** थॉमसन सीडलेस, सुग्रावन, रीगल सीडलेस, सेंटेनियल सीडलेस, ऑटम क्रिस्प, कॉटन कँडी आणि स्वीट ग्लोब

***लाल जाती :*** *क्रिमसन सीडलेस, फ्लेम सीडलेस, रुबी, स्वीट सेलिब्रेशन, टिम्को*

**काळी किंवा निळी जात :** समर रॉयल, मेलॉडी, ऑटम रॉयल, साबले सीडलेस

### काही जातींची वैशिष्ट्ये

- **कॉटन कँडी :** विशिष्ट चव (टॉफी वा केरेमेल), काढणी पश्चात कालावधी व अधिक उत्पादनासाठी.
- **स्वीट ग्लोब:** कुरकुरीतपणा, कमी आंबटपणा, उत्कृष्ट साठवणूक कालावधी (९० दिवस), पातळ त्वचा, जास्त उत्पादकता.
- **स्वीट सेलिब्रेशन :** आकर्षक चमकदार लाल रंग, उच्च उत्पादनक्षमता, कुरकुरीतपणा, चवदार, नैसर्गिक मोठे मणी, मध्यम उत्पादन खर्च, फळाची उत्कृष्ट गुणवत्ता.
- **रेड ग्लोब:** मोठे मणी, गुलाबी लाल रंग, टणक आणि कुरकुरीत गर.
- **क्रिमसन सीडलेस :** गुलाबी ते फिकट लाल रंग, गोड चव, कुरकुरीतपणा.
- **फ्लेम सीडलेस :** उत्कृष्ट चव, टणक, कुरकुरीत गर.
- **रूबी सीडलेस :** गडद लाल, गोड, रसाळ व कुरकुरीत फळ.

(राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे)

